ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भारताच्या विकासातील दारिद्र्य ही एक मोठी समस्या

* कु. शुभांगी लालू कोंडलाडे व **प्रा. डॉ. संजय पांडूरंगराव काळे

* एम.ए. (अर्थशास्त्र) बी.एड., पीपल्स कॉलेज, (अर्थशास्त्र विभाग), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

** सह प्राध्यापक आणि संशोधक मार्गदर्शक, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड.

गोषवारा :

मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी आवश्यक असणाज्या गोष्टींचा अभाव म्हणजे दारिद्र्य म्हणता येईल. जगता खूप कमी देश विकसित आहेत. कारण त्यांच्या देशात राहणाज्या लोकांचा विकास पूर्णपणे झालेला आहे. तसेच जगात अनेक अविकसित देश आहेत. त्या देशातील राहणाज्या लोकांना राहणीमान, शिक्षण, बेरोजगारी, दारिद्र्य, लोकसंख्या, अन्न अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक देश हा प्रयत्नशील असतो.

भारतात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येने देशाच्या विकासा आढ अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. त्या अनेक प्रश्नांपैकी दारिद्र्य हा एक आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. कृषी ही हंगामी स्वरूपाची असल्यामुळे सर्वांना योग्य प्रमाणात रोजगार मिळत नाही. रोजगार न मिळाल्याने लोकांचे उत्पन्न कमी आहे. म्हणून ते आपल्या गरजा पूर्ण करू शकत नाही. अपुज्या सुविधांमध्ये जीवन जगणे म्हणजेच दारिद्र्याचे जीवन जगणे होय. भारतात 20 ते 25 टक्के लोकसंख्या दारिद्र्याचे जीवन जगत आहे. त्यासाठी भारतातील लोकांचे दारिद्र्य कमी करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. लोकांचे उत्पन्न वाढले असता देशाच्या उत्पन्नात वाढ होईल व देशाच्या विकासाला गती मिळेल. म्हणून भारताच्या विकासात दारिद्र्य ही एक मोठी समस्या हा शोध निबंध अभ्यासण्याचे ठरवले आहे.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रस्तावना (Introduction) :

जागतिक बँकेच्या अहवालानुसार जगात विकसनशील देशात 500 दशलक्ष माणसे गरीब आहेत. त्यापैकी 85 टक्के माणसे पराकोटीच्या दारिद्र्यात राहतात. आशिया खंडात गरीबीचा प्रचंड प्रश्न आहे. ग्रामीण, नागरी विभागात खूप समस्या आहेत. ग्रामीण, नागरी विभागात प्रचंड विषमता वाढत आहे. रोजगारासाठी खेड्यातून (ग्रामीण भागातून) शहरात स्थलांतर केले जाते. त्यामुळे गलिच्छ वस्त्या निर्माण झाल्या. वाढत्या लोकसंख्येस रोजगारीची, स्वयंरोजगाराची संधी नसल्याने वाढती लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते. बेकारी असल्यामुळे दारिद्र्यात वाढ होते. त्याबरोबरच आरोग्य, आहार, राहणीमान, शिक्षण या किमान गरजांची

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

पूर्तता होत नाही. म्हणून श्रीमंत-गरिब यातील उत्पन्न विषमतेची दरी वाढत आहे.

देशाचा विकास होण्यासाठी लोकांना रोजगार मिळणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने दारिद्र्य निर्मुलनासाठी विविध उपाययोजना केल्या, परंतु यामध्ये अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. आजही देशात दारिद्र्याचे प्रमाण बज्यापैकी दिशून येते. भारतीय दारिद्र्याचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी डॉ. लकडवाला समिती, तेंडूलकर समिती, डॉ. रंगराजन समिती या सारख्या समितींची स्थापना केली. शिक्षणातील अभाव, उत्पन्नातील असमानता, बेरोजगारीचे मोठे प्रमाण यामुळे भारतातील गरिबीचे (दारिद्र्याचे) प्रमाण वाढले आहे.

उद्दिष्ट्ये (Objective) :

1) भारतीय दारिद्र्याचे स्वरूप अभ्यासणे.
2) भारताच्या दारिद्र्यात झालेले बदल अभ्यासणे.
3) दारिद्र्य निर्मुलनासाठी केलेल्या उपायांचा आढावा घेणे.
4) दारिद्र्य वाढीची कारणे पाहणे.
5) दारिद्र्याचा देशाच्या विकासावर होणारे परिणाम अभ्यासणे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, भारताचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल, तज्ञांचे शोध निबंध, वृत्तपत्रे, इंटरनेट, शासकीय गॅझेट इत्यादी मधून माहितीचे संकलन करून प्रस्तुत लेख तयार करण्यात आला.

दारिद्र्याची संकल्पना (Concept of Poverty) :

विविध तज्ञांनी दारिद्र्य ही संकल्पना स्पष्ट केली आहे. दारिद्र्याच्या संकल्पनेत किमान वस्तुंचा उपभोग घेऊ शकत नाही. (Those who fails to reach a certain minimum consumption standard) अर्थतज्ञांनी उत्पन्नाच्या आधारावर दारिद्र्य ही संकल्पना मांडली. डॉ. मिन्हास आणि वैजनाथन यांनी दारिद्र्य रेषा या संकल्पनेद्वारे विशद केली. डॉ. दांडेकर, रथ व अहूवालिया यांनी दारिद्र्य रेषा ही संकल्पना वापरली आहे.

डॉ. दांडेकर व रथ यांनी किमान गरजांची पुर्तता हा निकष लावताना ग्रामीण भागात 2400 उष्मांकाचे अन्न (कॅलरीज) शहरी भागात 2100 उष्मांकाचे अन्न या निकषा आधारावर 1989-90 च्या किमतीच्या आधारावर ग्रामीण भागात दरडोई 76 रूपये आणि शहरी भागात 88 रूपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेले दारिद्र्य रेषेखालील समजले जातात.

1) **सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty) :**

सापेक्ष दारिद्र्य ही संकल्पना उत्पन्नातील विषमतेवर आधारित आहे. म्हणजे ही संकल्पना दोन गटातील उत्पन्न विषमता स्पष्ट करण्यास मदत करते. एक गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा जास्त असलेला तर दुसरा गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा कमी उत्पन्न असलेला असतो. साहजिकच कमी उत्पन्नातील गट हा सापेक्ष दारिद्र्यात जीवन जगत असतो. कारण या गटातील व्यक्तिंना मिळणाज्या उत्पन्नातून त्यांच्या सामान्य गरजांची पूर्तता होत नाही.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

2) **निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty) :**

ज्यावेळेस व्यक्तिची किमान जिवनावश्यक गरजा भागविण्यासाठी क्षमता नसते तेव्हा त्यास निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणता येईल. थोडक्यात व्यक्तिला प्राप्त होणाज्या उत्पन्नातून त्याच्या किमान जिवनावश्यक गरजा भागत नसतील तर त्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

भारतातील दारिद्र्य (Poverty in India) :

1) **ग्रामीण भारतातील दारिद्र्य :**

गरिब किंवा दरिद्री कोणाला म्हणावे ? या संबंधी डॉ. दांडेकर व रथ, मिन्हास, लकडवाला इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आकडेवारीचा आधार घेवून वरील प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामते, ग्रामीण भागातील दरिद्री लोकांत खालील वर्गातील लोक जास्त प्रमाणात आढळून येतात.

भूमीहीन शेतमजूर, 2.5 हेक्टरपेक्षा कमी जमीन असणारे सीमांत शेतकरी, 2.5 ते 5 हेक्टर पर्यंत जमीन असणारे लहान शेतकरी, परंपरागत रोजगार गमावलेले ग्रामीण कारागीर, कारागिराकडे काम करणारे मजूर, भटक्या व मागासलेल्या जातीचे लोक, आदिवासी आणि जंगलात राहणारे लोक इत्यादी.

भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे अंदाज (Estimates of Rural Power) :-

भारतातील विविध अर्थतज्ञांनी आणि काही संस्थांनी दारिद्र्याचे मोजमाप करून अंदाज व्यक्त केले आहे. त्यासाठी त्यांनी दारिद्र्य रेषा (Poverty Line) हा निकष लावला. सामान्यपणे प्रतिदिनी प्रत्येक व्यक्तीच्या किमान निर्वाह पातळीस (Minimum Subsistence Level) दारिद्र्य रेषा म्हणतात. याचा अर्थ किमान निर्वाह पातळी गाठण्याएवढे उत्पन्न नसणाज्या व्यक्तींचा समावेश दारिद्र्यात केला जातो. या प्रमाणे दारिद्र्याचे मोजमाप आणि अंदाज केला जातो.

श्री. पी. डी. ओझा यांचा अंदाज-

श्री. ओझा यांनी प्रतिदिनी 2250 उष्मांक मिळविण्या इतक्या उत्पन्न पातळीवरून भारतातील दारिद्र्यात राहणारी लोकसंख्या मोजली आहे. त्यांच्या मते, 1960-61 च्या किंमती संदर्भात ग्रामीण भागात दरडोई उपभोग खर्च 8-11 रूपये महिना आवश्यक होता. श्री. ओझा यांच्या मते, 1960-61 मध्ये भारतातील ग्रामीण भागात 184 दशलक्ष लोकसंख्या (51.8%) दारिद्र्यावस्थेत होती. 1967-68 मध्ये ही संख्या 289 दशलक्ष (70%) झाली. याचा अर्थ ग्रामीण भागातील दारिद्र्यात वाढ झाली.

डॉ. दांडेकर आणि डॉ. रथ यांचे अंदाज-

श्री. दांडेकर आणि डॉ. रथ यांनी घ्भारतातील दारिद्र्यङ या ग्रंथात दरडोई उपभोग खर्चाच्या आधारावर दारिद्र्याचे मोजमाप केले. त्यांच्या मते, किमान पोषण आहारासाठी म्हणजेच 2250 उष्मांक प्राप्तीसाठी भारतातील ग्रामीण भागात 180% रूपये वार्षिक दरडोई उत्पन्न 1960-61 च्या किंमतीनुसार असणे आवश्यक आहे. 1968-89 च्या किंमतीनुसार ग्रामीण भागातून लोकांना किमान 324 रूपये वार्षिक दरडोई उत्पन्न मिळाले पाहिजे. दारिद्र्य रेषेतील

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

दरडोई उत्पन्नाची कसोटी विचारात घेता 1968-69 मध्ये ग्रामीण भागात 165 दशलक्ष किंवा 49% टक्के लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत होती.

नियोजन मंडळ आणि जागतिक बँकेचा अंदाज-

भारताच्या नियोजन मंडळाने आणि जागतिक बँकेने भारतातील दारिद्र्याचे अंदाज एकाच पध्दतीने केले आहेत. 1973-74 च्या किंमतीच्या संदर्भात ग्रामीण भागासाठी दरमाह दरडोई उत्पन्न 49.1 रूपये खर्चावरून दारिद्र्यरेषा ठरविण्यात आली. त्यावरून 1970, 1980 व 1988 या काळात भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्यात किती बदल झाला याची माहिती गोळा केली. याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे.

1970-1988 या काळात भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण 53% पासून 41.7% पर्यंत कमी झाले. असे असले तरी दारिद्र्य अवस्थेतील आणि ग्रामीण लोकसंख्या या काळात 236 दशलक्ष पासून 252 दशलक्ष पर्यंत वाढली.

श्री. लकडवाला यांचा अहवाल :-

नियोजन मंडळाने श्री लकडवाला यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीने 1993 मध्ये दारिद्र्यासंबंधीचा आपला अहवाल सादर केला. या समितीने 1973-74 च्या किंमतीनुसार दारिद्र्यरेषा म्हणून ग्रामीण भागात दरडोई मासिक खर्च 49.09 रूपये निश्चित केला. तसेच शहरी भागात दरडोई मासिक खर्च 57 रूपये निश्चित केला. त्यांच्या मते, 1973-74 ते 1987-88 या 14 वर्षाच्या कालाखंडामध्ये दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे.

2) शहरी भागातील दारिद्र्य :

डॉ. दांडेकर आणि रथ यांच्या मते, ग्रामीण भागातील जे लोक रोजगाराच्या आशेने शहराकडे येतात त्यांच्यामुळे शहरी दारिद्र्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कामधंदा शोधण्याच्या हेतूने खेड्यातील शहराकडे येतात. परंतू त्यांना रोजगार मिळणे कठिण जाते. काहींना रोजगार मिळतो परंतु त्यांना मिळणारे वेतन एवढे कमी असते की, त्यात त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, करमणूक इत्यादी गरजा भागविणे अशक्य होते. त्यामुळे त्यांना गलिच्छ वस्तीत राहावे लागते आणि कसेतरी जीवन जगावे लागते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

तक्ता क्र.1

भारतातील दारिद्र्याचे प्रमाण (टक्केवारी मध्ये)

अ.क्र.	वर्ष	ग्रामीण	शहरी	एकूण
1	वाय.के.अलघ			
	1973-74	56.44	49	54.88
2	डी.टी.लकडवाला			
	1977-78	53.07	45.2	51.32
	1983-84	45.65	40.8	44.48
	1987-88	39.09	38.2	38.46
	1993-94	37.27	32.5	35.97
	1999-2000	27.09	23.5	26.1
3.	सुरेश तेंडूलकर			
	1993-94	50.1	31.8	45.3
	2004-05	41.8	25.7	37.2
	2009-10	33.8	20.9	29.8
	2011-12	25.7	13.7	21.9
4.	सी. रंगराजन			
	2009-10	39.6	35.1	38.2
	2011-12	30.9	26.4	29.5

स्रोत: *Press note on poverty stimulation 2011-12, Planning commission 2013, Government of India*

प्रस्तुत तक्ता क्र.1 मध्ये वाय. के. अलघ यांच्या अहवालानुसार सन 1973-74 या वर्षी ग्रामीण व शहरी दारिद्र्य अनुक्रमे 56.44 व 49 टक्के असून एकूण दारिद्र्य 54.48 टक्के आहे असे सांगितले.

डी. टी. लकडवाला यांच्या अहवालानुसार सन 1977-78 ला एकूण दारिद्र्य 51.32 टक्के, सन 1983-84 ला एकूण दारिद्र्य 44.48 टक्के, सन 1987-88 ला एकूण दारिद्र्य 38.86 टक्के, सन 1993-94 ला एकूण दारिद्र्य 35.97 टक्के आहे असे सांगितले. तसेच सन 1999-2000 या वर्षी एकूण दारिद्र्य 26.1 टक्के आहे असे सांगितले. म्हणजेच 1999-2000 या वर्षी दारिद्र्य हे निम्या टक्क्यांनी कमी झालेले दिसते.

सुरेश तेंडूलकर समितीच्या अहवालानुसार सन 1993-94, 2004-05, 2009-10, 2011-12 या वर्षातील एकूण दारिद्र्य अनुक्रमे 45.3, 37.2, 29.8, 21.9 असे आढळून आले असून 2011-12 या वर्षात एकूण दारिद्र्य हे निम्यापेक्षा जास्त प्रमाणात कमी करण्यात यश आले आहे.

सी. रंगराजन यांनी सन 2009-10 ला एकूण दारिद्र्य 38.2 टक्के तर 2011-12 ला 29.5 टक्के आढळले आहे असे सांगितले.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

वरिल दारिद्र्याच्या टक्केवारीवरून असे लक्षात येते की, दारिद्र्याचे प्रमाण हे कमी-कमी होत असल्याचे आढळून येते. परंतू दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्याची तीव्रता ही खूप मंद गतीची आहे.

क्ता क्र.2

राज्यनिहाय दारिद्र्याचे प्रमाण (सन 2019-21)

अ.क्र.	राज्याचे नाव	दारिद्र्याचे प्रमाण (टक्केवारीत)
1	बिहार	33.76
2	झारखंड	28.81
3	मेघालय	27.79
4	उत्तरप्रदेश	22.93
5	मध्यप्रदेश	20.63
6	आसाम	19.35
7	छत्तीसगड	16.37
8	ओडिसा	15.38
9	नागालॅन्ड	15.43
10	राजस्थान	15.31
11	अरूणाचल प्रदेश	13.76
12	त्रिपूरा	13.11
13	पश्चिम बंगाल	11.89
14	गुजरात	11.66
15	उत्तराखंड	9.67
16	मणिपूर	8.10
17	महाराष्ट्र	7.81
18	कर्नाटक	7.58
19	हरियाणा	7.07
20	आंध्रप्रदेश	6.06
21	तेलंगणा	5.88
22	मिझोरम	5.30
23	हिमाचल प्रदेश	4.93
24	पंजाब	4.73
25	सिक्कीम	2.60
26	तामिळनाडू	2.20
27	गोवा	0.84
28	केरळ	0.55

स्रोत:- NITI Aayog (2023), Indian's National multidimensional poverty Index : A Progress Review 2023, NITI Aayog, Government of India, New Delhi, P-34

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

वरिल तक्ता क्र.2 असे लक्षात येते की, सन 2019-21 ला राज्यनिहाय दारिद्र्याच्या मोजलेल्या प्रमाणात सर्वात जास्त दारिद्र्य (गरिबीचे प्रमाण) बिहार राज्यात 33.76 टक्के असल्याचे आढळून येते. बिहार मधील दारिद्र्य तीव्र स्वरूपाचे आहे तर सर्वात कमी दारिद्र्य 0.55 टक्के केरळ राज्यात आढळलेले आहे. केरळ राज्यातील दारिद्र्य खूप नगण्य स्वरूपाचे आहे.

महाराष्ट्रात 7.81 टक्के एवढे दारिद्र्य आढळलेले आहे. ज्या राज्यात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे त्या राज्यात आरोग्य, शिक्षण, रोजगार, उत्पन्न या घटकांचा अभाव व कमतरता असलेले दिसून येते. तसेच वाढलेले बेरोजगार आणि वाढलेली लोकसंख्या या घटकांमुळेही दारिद्र्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. बहुआयामी दारिद्र्य कमी करण्यासाठी देशातील ज्या राज्यात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे त्या राज्यांवर लक्ष केंद्रीत करून त्या राज्यात आरोग्य, रोजगार, शिक्षण या बाबत विविध योजना राबवून पायाभूत सुविधांची निर्मिती करणे गरजेचे आहे. तसेच लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठीही उपाययोजना राबविल्या पाहिजे.

दारिद्र्य वाढीची कारणे :

दारिद्र्य वाढीची अनेक कारणे कारणीभूत ठरतात जसे की, वैयक्तिक कारणे, सामाजिक कारणे, आर्थिक कारणे, नैसर्गिक कारणे, राजकिय कारणे इत्यादी.

1) **निरक्षरता :**

दारिद्र्य आणि निरक्षरता यांचा परस्पर संबंध आहे. दारिद्र्याने शिक्षण घेता येत नाही. श्रमिकांना शिक्षणा अभावी अंगमेहनतीचा रोजगार करावा लागतो. त्यांची मुले सुध्दा अकुशल श्रमिक होतात. निरक्षरता दारिद्र्याचे दुष्ट चक्र आहे. निरक्षर व्यक्तीस उत्पन्नाच्या संधी नसतात. दारिद्र्याने गरिबीची दु:खे वाढतात.

2) **आर्थिक मंदी, चलनवाढ :**

आर्थिक मंदीने उद्योग, वाणिज्य, व्यापारात घसरण होते, कारखाने बंद पडतात, कामगार बेकार होतात. उदा. कापड गिरण्या, साखर कारखाने. भारतात चलनवाढीच्या दबावाने दारिद्र्य वाढले आहे.

3) **मागासलेली शेती :**

भारत हा कृषी प्रधान देश असून सुध्दा शेतीसाठी आवश्यक असणाज्या आधुनिक तंत्रज्ञानाची, बियाणांची कमतरता आहे. भारतात जवळपास 70 टक्के लोक शेती करतात. यातील बरेच लोक परंपरागत शेती करतात. अनेक शेतकज्यांना शेतीपासून उदरनिर्वाह एवढेही उत्पन्न मिळत नाही त्यामुळे त्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

4) **मोठ्या प्रमाणात बेकारी :**

देशाच्या अपुज्या आर्थिक विकासासामुळे वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे असंख्य लोकांना बेकारी व अर्धबेकारीचा प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. बेकारीच्या काळात उत्पन्नाचे दुसरे कोणतेही पर्याय साधन नसल्याने त्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

5) **नैसर्गिक साधन संपत्तीचा अपुरा वापर :**

राष्ट्राच्या नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये खनिजे, जंगले, जलसंपत्ती, भूमी, औद्योगिक शक्ती साधने, उर्जा

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

इत्यादींचा समावेश होतो. मानवी जिवनमान हे या साधन संपत्तीच्या उत्पादन क्षमतेवर अवलंबून आहे. ज्या देशाची उत्पादन क्षमता अधिक आहे ते देश सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगतिशील असतात. भारतात भांडवलशाही कमतरता, नवीन तंत्रज्ञानाचा अभाव व इतर विविध कारणांनी नैसर्गिक साधन संपत्ती आणि उत्पादन साधनाचा पुरेपूर वापर होऊ शकत नाही. परिणामी राष्ट्रीय उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे प्रति व्यक्ति उत्पन्न अल्प राहून दारिद्र्याचा प्रश्न गहन बनला आहे.

6) **लोकसंख्येची बेसूमार वाढ :**

भारतात आर्थिक नियोजनाचा अवलंब करून देशाच्या आर्थिक विकासासाठी प्रयास केले जात आहे. आतापर्यंत भारताने विविध पंचवार्षीक योजना अंतर्गत आर्थिक विकास केला आहे. परंतु आर्थिक विकासाच्या दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. त्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ झाली नाही. परिणामी असंख्य लोक दारिद्र्यात जीवन जगत आहे.

7) **संपत्तीचे असमान वाटप :**

ज्यांच्याकडे साधन संपत्तीचे केंद्रिकरण होते तेच श्रीमंत होतात. परंतू ज्यांचेकडे अशी संपत्ती नाही ते मात्र कायमचे गरिब राहतात. भारतासारख्या राष्ट्रात साधनसामुग्रीचे व संपत्तीचे केंद्रिकरण काही लोकांच्याच हातात आहे. एकूण लोकसंख्येपैकी 10 टक्के लोकांकडे 90 टक्के संपत्तीचे केंद्रिकरण तर 90 टक्के लोकांकडे 10 टक्के संपत्ती केंद्रित झाली असल्याचे दिसून येते. यातूनच समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' असे गट पाहावयास मिळतात.

8) **देशाचा अपुरा विकास :** भारताच्या अपुज्या विकासामुळे देशासमोर अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न निर्माण झालेले आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न इतर विकसीत देशाच्या तुलनेत बरेच कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्यामुळे प्रत्येकाच्या वाट्याला येणारे दरडोई उत्पन्न कमी आहे. एवढ्या कमी उत्पन्नात लोकांना अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजा भागविता येत नाहीत.

9) **भांडवल निर्मितीचा दर कमी :** कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास भांडवल निर्मितीवरच अवलंबून असतो. भारतात बहुसंख्य लोकांचे उत्पन्न कमी आहे. उत्पन्न कमी म्हणून बचतही कमी, म्हणून भांडवल निर्मितीही कमी. भांडवल कमी म्हणून गुंतवणूक कमी, गुंतवणूक कमी म्हणून राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार कमी. असे दृष्टचक्र गरीब देशात सतत फिरत असते.

10) **सामाजिक घटक :** भारतातील दारिद्र्यास सामाजिक कारणेही जबाबदार आहेत. धार्मिक रूढी, परंपरा, सण-समारंभाचे व व्रतवैकल्यांचे स्तोम इत्यादी. त्यामुळे लोक अनेक प्रकारचे अनावश्यक व अनुत्पादक खर्च करतात. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो. निरक्षता व अडाणीणा, जातीयवाद, संयुक्त कुटुंब पध्दती, नशिबावर विसंबून राहण्याची प्रवृत्ती इत्यादींवर लोक नवीन विचार उपक्रमशिलता या पासून वंचित आहेत. वारसा हक्काचा कायदा, आर्थिक व सामाजिक संस्थांची कमतरता व

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

अलवचिक रचना असेही घटक विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करतात.

दारिद्र्य दूर करण्यासाठी उपाययोजना :

भारतातील दारिद्र्य दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने अनेक उपाय योजलेले आहे. जसे वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे, ग्रामीण भागात शिक्षण, प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे, उद्योजकाचा विकास करणे, लघु व कुटीर उद्योगांना चालना देणे, जमिनीच्या विभाजनावर व तुकडीकरणावर बंदी घालणे इत्यादी. या व्यतिरिक्त काही कार्यक्रम व योजनाही सरकारने सुरू केल्या आहेत. येथे एक गोष्ट नमुद करता येते की, दारिद्र्य व बेकारी दूर करण्यासाठीच्या उपाययोजना या सारख्याच आहेत. कारण लोकांना रोजगार मिळाला की, त्यांना उत्पन्न मिळू लागते. त्यांच्या गरजा भागू लागतात. परिणामी त्यांच्या दारिद्र्याची तीव्रता कमी होते. बेरोजगारी दूर करण्यासाठी ज्या उपाययोजना आहेत, जे कार्यक्रम आहेत ते सर्व लोकांच्या उत्पन्नात वाढ करणारे आहेत. लोकांना काम देणे, त्यांचे उत्पन्न वाढविणे हा दारिद्र्य दूर करण्याचा मार्ग आहे. दारिद्र्य दूर करण्यासाठी सरकारने पुढील उपाय अंमलात आणले आहेत.

1) ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम (Rural Work Programme):

1961 मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या कार्यक्रमासाठी 150 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. उपलब्ध श्रमशक्तीचा वापर करणे व रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा योजनेचा उद्देश होता. तज्ञ मंडळीच्या अभावी ही योजना कार्यन्वीत आणण्यात अनेक अडचणी आल्या.

2) ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना (Crash Scheme for Rural Employment):

कुटुंबातील एका व्यक्तीला रोजगार देण्यासाठी ही योजना 1971 मध्ये तयार करण्यात आली. चौथ्या योजनेपुरतीच मर्यादित होती. या काळात 3.15 लाख मनुष्याना रोजगार निर्माण करण्यात आला. 1971-74 या काळात 174 कोटी रूपये खर्च करण्यात आले.

3) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (National Rural Employment Programme) :

ग्रामीण भागात राहणाज्या जवळजवळ 20 दशलक्ष कुटुंबे भूमिहीन आहेत. हा वर्ग अत्यंत गरिब आहे. या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1. ग्रामीण भागात राहणाज्या व बेकार असणाज्या स्त्री-पुरूषांना उपयुक्त असा रोजगार निर्माण करणे.
2. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास साधण्यासाठी तेथे संसाधन निर्माण करण्यासाठी कायमस्वरूपाची सत्ता निर्माण करणे.
3. ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या राहणीमानात व त्यांच्या पोषण क्षमतेत वाढ करणे.

4. किमान गरजांचा कार्यक्रम (Minimum Needs Programme) :-

पाचव्या योजनेत सुरू करण्यात आला. या कार्यक्रमासाठी

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

26.7 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. सहाव्या योजनेत 5808 कोटीची तरतूद करण्यात आली. या कार्यक्रमा अंतर्गत पुढील गोष्टींवर भर देण्यात आला.

1. प्राथमिक व प्रौढ शिक्षणाचा विस्तार करणे.
2. ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देणे.
3. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.
4. ग्रामीण भागात रस्त्यांची सोय करणे.
5. ग्रामीण भागात विजेची सोय करणे इत्यादी.

5. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार हमीची योजना (Rural Landless Employment Gurantee Scheme (RLEGS) :

ग्रामीण भागात शेतीची कामे नसताना भूमीहीन शेतमजूरांना बेकारीला तोंड द्यावे लागते. त्यांना अशावेळी मदत करण्यासाठी ऑगस्ट 1983 रोजी ही योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील कुटुंबातील किमान एका व्यक्तिला एका वर्षात किमान 100 दिवस रोजगार पुरविणे आणि ग्रामिण विकासाला पुरक अशी कामे हाती घेणे, जसे ग्रामीण भागाला जोडणारे रस्ते बांधणे, पडित जमिनीत सुधारणा करणे, सामाजिक वनिकरण, जमिनीचे संरक्षण करणे इत्यादी.

6. सिमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास कार्यक्रम (Marginal Farmers Labour Development Programme-MFAL): सिमांत शेतकरी आणि शेतमजूर हे ग्रामीण भागातील सर्वात दुर्बल घटक आहेत. त्यांच्या विकासासाठी 1970-71 पासून सिमांत शेतकरी व शेतमजूर विकास कार्यक्रम अंमलात आणला. चौथ्या योजनेत या योजने अंतर्गत देशाच्या वेगवेगळ्या भागात 41 प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यात पाणीपुरवठा, भू-संरक्षण, दुग्धविकास, कुक्कुटपालन, पशूपालन इत्यादी योजना प्रमुख होत्या. या प्रकारामुळे 89 लाख सिमांत शेतकरी व शेतमजुरांच्या कुटुंबाला लाभ झाला. 1980 मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात या योजनेचे विलिनीकरण करण्यात आले.

संदर्भग्रंथ :

1) प्रा. डॉ. डी. एस. मनवर- भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, अरूणा प्रकाशन, लातूर.
2) प्रा. सुदाम कडूजी कोरडे, डॉ. जयवंत एस. भोयर- भारतातील दारिद्र्याची समस्या : एक संक्षिप्त आढावा.
3) उदयराज चंदन चव्हाण- भारतातील दारिद्र्य गणना : बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक एक अभ्यास.
4) प्रा. रायखेलकर व डॉ. दामजी- भारतीय अर्थव्यवस्था (जानेवारी 2013), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
5) डॉ. सुखदेव खंदारे- भारतीय अर्थव्यवस्था, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.
6) डॉ. लालासाहेब नारायणराव घाटगे आणि डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे- भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन.
7) कै. डॉ. स. श्री. मु. देसाई आणि डॉ. सौ. निर्मल भालेराव- भारतीय अर्थव्यवस्था (जानेवारी 2014), निराली प्रकाशन.
8) डॉ. जी. एन. झामरे- भारतीय अर्थव्यवस्था (जून 2016), पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

9) प्रा. प्र. रा. कुलकर्णी- भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

10) प्रा. डॉ. सुदर्शन देशमुख- आदिवासी समाजाचे दारिद्र्य, निर्मल प्रकाशन, नांदेड.

11) https://www.ijaresm.com

12) https://oldisrj.ibp.world (Indian Streams Research Journal)

Cite This Article:

कु. कोंडलाडे शु. ला. व प्रा. डॉ. काळे सं. पां. (2025). **भारताच्या विकासातील दारिद्र्य ही एक मोठी समस्या.** In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp.75–85).

Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16417183